प्रेस नोट दि.२१/१०/२०१८

लडाखमधील हॉट spring या ठिकाणी केंद्रीय राखीव पोलीस दलातील 10 शूर शिपायांवर दिनांक 21 ऑक्टोबर 1959 रोजी चीनच्या सशस्त्र सैनिकांनी हल्ला केला. या हल्ल्यात पोलीसांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला व सरहद्दीचे रक्षण करताना प्राण गमावले. त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ 21 ऑक्टोबर हा दिवस प्रतिवर्षी भारतभर "पोलीस स्मृतीदिन" म्हणून पाळण्यात येतो.

त्या अनुषंगाने दिनांक 21/10/2018 रोजी सकाळी 08.00 वा. सिधुदुर्ग जिल्हा पोलीस दलाचे वतीने पोलीस मुख्यालय, सिधुदुर्ग येथील कवायत मैदानावर गेल्या वर्षभरामध्ये पोलीस दलातील ज्या पोलीस अधिकारी व कर्मचायांना कर्तव्य बजावत असताना हौतात्म्य प्राप्त झाले, त्यांच्या स्मृतीस आदरांजली वाहण्यात आली. सदरचा कार्यक्रम पोलीस अधीक्षक श्री.दिक्षीत गेडाम यांचे प्रमुख उपस्थित संपन्न झाला. दिनांक 01/09/2017 ते 31/08/2018 या कालावधीत भारतामध्ये एकुण 419 पोलीस अधिकारी व जवान यांनी कर्तव्य बजावत असताना हौतात्म्य पत्करले व शहीद झाले. यामध्ये महाराष्ट्र पोलीस दलातील 03 पोलीस जवानांनी कर्तव्य बजावीत असताना प्राणार्पण केलेले आहे. सदर कार्यक्रमास अपर पोलीस अधीक्षक श्री.विनीत गोयल जिल्हायातील ४० पोलीस अधिकरी व २४१ पोलीस कर्मचारी यांनी भाग घेतला होता.